


# अभीप्सा

अखिल भारतीय पत्रिका

जून २०२६

वर्ष ५१ अंक ०६

# अभीप्सा

(ईश्वराप्रति असलेली आस)

**प्रकृती ती जड । करील उघड । ईश्वरी ते रूप । सुघटित ।।**

---

**प्रकाशक**

श्री. प्रदीप नारंग, पुडुचेरी

**प्रकाशन स्थळ**

श्रीअरविंद सोसायटी

सोसायटी हाऊस, ११ सेंट मार्टिन स्ट्रीट, पुडुचेरी – ६०५००१

**संपादक**

डॉ. केतकी मोडक, पुणे

भ्रमणध्वनी : ९४२१०१६०८९

ई–मेल : editorabhipsa2018@gmail.com

**मुद्रक**

सेन्थिल ऑण्डवर प्रेस, पुडुचेरी – ६०५००१

**चिंतनार्थ...**

'आद्यशक्ती' ही मूलभूत 'शक्ती' आहे, त्यामुळे ती 'श्रीमाताजीं'चे परमोच्च रूप आहे.

मात्र इतकेच की, एखादी व्यक्ती ज्या स्तरावरून त्या आद्यशक्तीकडे पाहते त्या स्तरानुसार ती आद्यशक्ती भिन्न भिन्न प्रकारे अभिव्यक्त होते.

– श्रीअरविंद (CWSA 32 : 66)

*

# महेश्वरी

संपादकीय......................................................................०२
महेश्वरीचे स्वरूप..............................................................०३
ज्ञान आणि प्रज्ञा यातील फरक...........................................१५
श्रीअरविंद लिखित प्राज्ञवचने...............................................२८
संकीर्ण...........................................................................३१

---

## संपादकीय

महाशक्तीची महेश्वरी, महाकाली, महालक्ष्मी आणि महासरस्वती ही चार रूपं आहेत. त्यातील महेश्वरीच्या रूपाचा ‘अभीप्सा’ मासिकाच्या या अंकात विशेषत्वाने विचार करण्यात आला आहे.

सामान्य मानवी जीवनव्यवहार तर्कबुद्धीच्या अखत्यारीमध्ये चालू असतात. परंतु तर्कबुद्धी ही काही मानवी विकासाचा अंतिम टप्पा नाही. व्यक्तीच्या प्रयत्नांना ईश्वरी कृपेची जोड मिळाली तर, व्यक्ती बुद्धिपूर्वक मिळविलेल्या ज्ञानाच्या अतीत जाऊ शकते; तेव्हा ती प्रज्ञावंत होते.

श्रीअरविंद यांनी ज्ञान आणि प्रज्ञा यामध्ये असलेला फरक उलगडवून दाखविला आहे. श्रीअरविंद लिखित प्राज्ञ–वचने समजून घेताना, बुद्धिवंतांना मेजवानीचा लाभ होणार आहे, याची खात्री वाटते.

संपादक, अभीप्सा मासिक

**

---

अभीप्सा मासिक हे श्रीअरविंद सोसायटी, पाँडिचेरीचे मुखपत्र आहे.

---

योगी श्रीअरविंद म्हणजे पूर्वाश्रमीचे क्रांतिकारक अरविंद घोष आणि श्रीमाताजी म्हणजे पूर्वाश्रमीच्या मीरा अल्फासा, (फ्रान्स). ‘श्रीअरविंद आश्रम’ हा भारताच्या पूर्व किनाऱ्यावर पाँडिचेरी येथे आहे.



**महेश्वरी रूपातील श्रीमाताजी**

मला वाटते की, माझ्याजवळ अगदी सुरुवातीपासूनच तो प्रकाश राहिलेला आहे. कारण मी जेव्हा मॅडम थिऑन (गूढविद्येच्या अभ्यासक) यांना भेटले तेव्हा त्यांनी मला पहिल्याप्रथम हीच गोष्ट सांगितली होती. अर्थातच त्यांनी तो प्रकाश 'महेश्वरी'चा आहे असे काही सांगितले नव्हते. परंतु त्या म्हणाल्या होत्या, ''तुझ्यापाशी शुभ्रधवल प्रकाश आहे आणि तो प्रकाश आपोआप सर्व दुरिच्छा नाहीशा करून टाकतो.'' आणि मला तसा खरोखरच अनुभव आला. अशा प्रकारचे दुरिच्छा बाळगणारे जीव धुळीला मिळालेले मी पाहिले आहेत.

तर, सांगायचा मुद्दा असा की, तुम्ही तो प्रकाश डोळ्यांसमोर आणा आणि कल्पनेने तुमच्याभोवती एक प्रकारचा कोश तयार करा. किडे स्वतःभोवती कोश तयार करतात ना, तसा कोश झोपी जाण्यापूर्वी तुम्ही तुमच्याभोवती तयार करा. तुम्ही तो कोश तयार केलात आणि स्वतःला त्या शुभ्र कोशामध्ये गुरफटून घेतलेत तर, तुमचे शत्रू त्यामध्ये शिरकाव करू शकणार नाहीत आणि मग तुम्ही निर्धास्तपणे झोपी जाल. अशा वेळी बाहेरून दुरिच्छा बाळगणारी कोणतीही गोष्ट त्या कोशामधून आतमध्ये शिरकाव करू शकणार नाही, ही खात्री बाळगा.

पण व्यक्तीच्या अवचेतनामध्ये (subconscient) आधीच काहीतरी जाऊन बसलेले असते. त्याही गोष्टी एकेक करून, हळूहळू काढून टाकल्या पाहिजेत. मात्र एक गोष्ट लक्षात ठेवा; ती अशी की, महेश्वरीचा हा दिव्य प्रकाश सर्व-शक्तिमान असतो.

– श्रीमाताजी (Conversation with a disciple, July 10, 1965)

*

साधक : एके रात्री मला अगदी शीतल, शांतीपूर्ण, विशाल असा पिवळसर पांढरा प्रकाश वरून खाली येताना दिसला.

श्रीअरविंद : जर तो सोनेरी पांढरा प्रकाश असेल तर, तो मनाच्या वरच्या पातळीवरून आलेला असतो आणि तुम्ही जी रंगसंगती सांगितलीत

त्यावरून तो महेश्वरी–महाकाली शक्तीचा प्रकाश असावा असे सूचित होते. उच्चतर मनाचा रंग फिकट निळा असतो.

– श्रीअरविंद (CWSA 32 : 268)

*

साधक : दुपारच्या वेळी मी वामकुक्षी घेत होतो. तेव्हा अंतर्मनात श्रीमाताजींचे स्मरण चालू होते. थोड्या वेळाने मला असे दिसले की, माझे सूक्ष्म मन, प्राण व शरीर माझ्या शरीरातून बाहेर पडून एका अतिशय सुंदर, गभीर आणि शांतिपूर्ण जगात जाऊन पोहोचले आहेत. नंतर मला असे दिसले की, अनेक संतमहात्मे, देवदेवता ध्यानावस्थेत अविरतपणे श्रीमाताजींना आवाहन करत होते. त्या जगतामध्ये अवर्णनीय आनंद होता. काय सुंदर जग होते ते! नंतर मला असे दिसले की श्रीमाताजी त्यांच्यामध्ये अवतरल्या आहेत. त्या दशभुज आणि गौरवर्णी दिसत होत्या.

अचानक मी जागा झालो. तेव्हा मला जाणवले की, माझे स्थूल मन, प्राण आणि शरीर श्रीमाताजींच्या परिघामध्ये वावरत आहेत. त्या अवस्थेत मी माझ्या शरीराकडे पाहिले तर मला माझा स्थूल देह हा सुवर्णमय झालेला दिसत होता. या संपूर्ण काळात मी अतिशय शांतपणे श्रीमाताजींना आवाहन करत होतो. मला हा जो अनुभव आला तो खरा होता का?

श्रीअरविंद : तुम्ही उच्चतर आध्यात्मिक मनाच्या प्रतलावर आरोहण केले होते आणि तेथे महेश्वरी ईश्वरी सत्याची शक्ती घेऊन अवतरित झाली होती, असे दिसते. त्याचा परिणाम म्हणून तुम्हाला शारीर–चेतनेमध्ये असताना, सर्व वस्तुमात्रांमध्ये अंतर्हित असणाऱ्या एकमेवाद्वितीय चेतनेचा आणि जीवनाचा बोध झाला. तसेच उच्चतर सत्याच्या सुवर्णमयी प्रकाशाने तुमच्या शरीरातील पेशी उजळून निघाल्या.

– श्रीअरविंद (CWSA 32 : 275)

*

| |
|---|
| वाचक अंकाविषयीच्या आपल्या प्रतिक्रिया<br>editorabhipsa2018@gmail.com या ईमेलवर कळवू शकतात. |

# ज्ञान आणि प्रज्ञा यातील फरक

## तर्कबुद्धी आणि प्रज्ञा

श्रीअरविंद लिखित वचन : *अलीकडेच मला उमगले की, जेव्हा तर्कबुद्धी (reason) लोप पावते तेव्हा प्रज्ञेचा (Wisodm) उगम होतो; ही मुक्ती लाभण्यापूर्वी माझ्याकडे फक्त ज्ञान (knowledge) होते.*

श्रीमाताजीकृत भाष्य : मी तुम्हाला पुन्हा एकदा सांगते की, ही जी वचनं आहेत ती हेतुपुरस्सर विरोधाभासात्मक अशा पद्धतीने लिहिलेली आहेत. मनाला किंचितसा धक्का बसावा आणि त्यांचे आकलन करण्यास मन प्रवृत्त व्हावे यासाठी, त्याला जागृत करण्यासाठी म्हणून ही वचनं त्या पद्धतीने लिहिली आहेत. या वचनांचा अर्थ शब्दशः लावणे योग्य नाही.

आपल्याला प्रज्ञावान व्हायचे असेल तर आपली तर्कबुद्धी नाहीशी झाली पाहिजे या विचारानेच इथे काही जण चिंताक्रांत झालेले दिसतात. पण हे तसे नाही, हे अजिबात तसे नाही. या वचनाचा अर्थ असा की, तुम्हाला प्रज्ञावान व्हायचे असेल तर, तर्कबुद्धी ही अस्तित्वाच्या शिखरस्थानी असता कामा नये आणि ती तुमच्या अस्तित्वाची स्वामिनी असता कामा नये.

### अस्तित्वाच्या शिखरस्थानी असणारी तर्कबुद्धी

दीर्घ काळपर्यंत, म्हणजे जोपर्यंत व्यक्तीला ज्ञानसदृश असे काही प्राप्त होत नाही तोपर्यंत तर्कबुद्धी ही तुमच्या अस्तित्वाची स्वामिनी असणे अपरिहार्यच असते. तसे नसेल तर, व्यक्ती स्वतःच्या भावावेगांच्या, कल्पनांच्या किंवा स्वतःच्या कमीअधिक सैरभैर भावनिक कल्पनांच्या हातचे बाहुले बनण्याची शक्यता असते. आणि तसे झाले तर, प्रज्ञेपासून आणि एवढेच नव्हे तर, समाजमान्य आचरण करण्यासाठी व्यक्तीला जे ज्ञान आवश्यक असते त्या ज्ञानापासून व्यक्तीची फारकत होण्याचा धोका असतो.

### तर्कबुद्धीचा पायरीसारखा उपयोग

सामान्य मानवी बुद्धीच्या शिखरस्थानी असणारी जी तर्कबुद्धी

माझा आत्मा हे जाणतो की, तो अमर आहे. पण तुम्ही शव–विच्छेदन करता आणि विजयी स्वरात गर्जना करता की, ‘‘कुठे आहे तुमचा आत्मा आणि कुठे आहे तुमची अमर्त्यता?’’

*

पटतील अशी कारणे देऊन, त्यांनी मला ‘ईश्वर कसा अस्तित्वात नाही,’ हे सिद्ध करून दाखविले आणि मी त्यांच्यावर विश्वास ठेवला.

कालांतराने मला ईश्वराचे दर्शन झाले, तो माझ्यापाशी आला आणि त्याने मला हृदयाशी कवळून घेतले.

आता मी कोणावर विश्वास ठेवू? इतरांच्या कारणमीमांसेवर की माझ्या स्वतःच्या अनुभवावर?

– श्रीअरविंद (CWSA 12 : 424)

**

**श्रीअरविंद लिखित प्राज्ञवचन व त्याचा मथितार्थ**

मनुष्यामध्ये ज्ञान आणि प्रज्ञा या दोन सहयोगी शक्ती असतात. ज्ञान म्हणजे (मनरूपी) विकारित माध्यमाच्या आधारे जेवढे दिसू शकेल तेवढे सत्य; त्या सत्यापर्यंत मन चाचपडत–चाचपडत येऊन पोहोचते. तर, दिव्य दृष्टीच्या डोळ्यांना आत्म्यामध्ये जे काही दिसते ती प्रज्ञा असते. – श्रीअरविंद (CWSA 12 : 423)

श्रीअरविंद लिखित या वचनाचा अर्थ तुम्हाला उलगडतो का पाहा बरे एकदा! विचार करा, चिंतनमनन करा, जो अर्थ उमगतो आहे तो लिहून काढण्याचा प्रयत्न करा. आणि तुम्हाला उमगलेला अर्थ कितपत बरोबर आहे, हे स्वतःच पडताळून पाहा ‘अभीप्सा’ मासिकाच्या पुढील अंकात! श्रीमाताजींनी त्याचा अर्थ कसा उकलून दाखवला आहे ते पुढच्या अंकामध्ये प्रकाशित करू. धन्यवाद...

– संपादक, ‘अभीप्सा’ मराठी मासिक

नमस्कार वाचकहो,

अभीप्सा मासिकातील काही पाने आपल्या अवलोकनार्थ येथे देण्यात आली होती. आपल्याला ह्या अंकातील विषयावरील आणि यासारख्या इतर विषयांवरील श्रीअरविंद आणि श्रीमाताजी यांचे विचार मराठीत समजून घ्यावयाचे असतील तर, आपण अभीप्सा मासिकाचे वर्गणीदार व्हावे, ही विनंती.

वर्गणीचा तपशील शेजारील पानावर दिला आहे.

– संपादक, अभीप्सा मासिक

## मासिकाचे स्वरूप

श्रीअरविंदांचे बहुतांशी सारे साहित्य मुळात इंग्रजी व बंगाली भाषेत आहे. तर श्रीमाताजी यांचे बहुतांशी वाङ्मय फ्रेंच व इंग्रजी भाषेत आहे. हे दुर्मिळ विचारधन मराठीत आणण्याचे प्रयत्न 'अभीप्सा' या मासिकाच्या माध्यमातून अव्याहतपणे चालू आहेत. पाँडिचेरीहून प्रकाशित होणाऱ्या श्रीअरविंद सोसायटीचे मुखपत्र असलेल्या 'ऑल इंडिया मॅगेझिन' या इंग्रजी मासिकाची मराठी आवृत्ती म्हणजे 'अभीप्सा.' १९७५ पासून हे मासिक नियमितपणे प्रकाशित होत आहे.

### वर्गणी व देणगीचा तपशील

वार्षिक वर्गणी : २०० रू. (१२ अंक)
तीन वर्षाचे दर : ५८० रू. (३६ अंक)
पाच वर्षांचे दर : ९६० रू. (६० अंक)
देणगीदार : ४००० रू.
(देणग्या 80 G अंतर्गत करसवलतीस पात्र आहेत.)

वर्गणी वा देणगीची रक्कम आपण ऑनलाईनदेखील भरू शकता.

### वर्गणी वा देणगी ऑनलाईन भरण्यासाठी बँकेचा तपशील

खातेदाराचे नाव : Sri Aurobindo Society
बँकेचे नाव : Central Bank of India, Pondicherry Branch
IFSC Code : CBIN0281354
A/C No. : 1235467709

*

**सूचना :** रक्कम भरल्याची पोहोचपावती व आपला संपूर्ण पत्ता membership@aurosociety.org आणि editorabhipsa2018@gmail.com या ईमेल आयडीवर पाठवावा ही विनंती; म्हणजे आपल्या पत्त्यावर अंक पाठवता येईल.

*

वर्गणीदारांना काही कारणाने अंक उपलब्ध न झाल्यास पुढील क्रमांकावर संपर्क करावा – श्री. गोविंद पोतदार ९३७३७२४५२०

# ईश्वरी निर्णयाचे अनुसरण

इ. स. १९२६ मधील ही गोष्ट आहे. श्रीअरविंद आणि श्रीमाताजी एका अतिशय तेजोमय निर्मितीवर कार्य करत होते. त्यांनी केलेल्या कार्याचा परिणाम म्हणून त्या सुमारास आश्रमातील सर्वांनाच आश्चर्यकारक अनुभव येत होते, त्यांचे देवदेवतांबरोबर संपर्क प्रस्थापित होत होते. चमत्कारसदृश अनुभवांची जणू एक मालिकाच सुरू होती...

रोजचा वृत्तांत कथन करण्यासाठी एके दिवशी श्रीमाताजी नेहमीप्रमाणेच श्रीअरविंदांकडे आल्या होत्या. त्यांची ती तेजोमय निर्मिती खरोखरच आता एका अतिशय मनोवेधक गोष्टीपर्यंत जाऊन पोहोचली होती. श्रीमाताजींनी काहीशा उत्साहाने त्याचा वृत्तांत श्रीअरविंदांना कथन केला.

तेव्हा श्रीअरविंद श्रीमाताजींना म्हणाले, ''तुम्ही जिचे वर्णन करत आहात ती अधिमानसिक सृष्टी (Overmind creation) आहे. तुम्ही आता असे चमत्कार घडवू शकाल की ज्यामुळे तुम्ही जगप्रसिद्ध होऊ शकाल. तुम्ही पृथ्वीवरील सर्व घटनांमध्ये प्रचंड उलथापालथ घडवून आणू शकाल, खरोखरच...'' असे म्हणून त्यांनी स्मितहास्य केले आणि ते पुढे म्हणाले, ''हे एक फार मोठे यश असेल. पण ती अधिमानसिक सृष्टी आहे. परंतु आपल्याला मिळवायचे आहे ते यश हे नव्हे. आपल्याला पृथ्वीवर 'अतिमानसा'ची (Supermind) प्रस्थापना करायची आहे.''

श्रीअरविंद काय सांगू इच्छित आहेत त्याचा मथितार्थ श्रीमाताजींना क्षणार्धात जाणवला. त्या आपल्या खोलीत गेल्या. आजवर प्रचंड परिश्रम करून त्यांनी जी निर्मिती केली होती ती त्यांनी अवघ्या दोन तासांच्या आत परत पाठविली. आणि त्या क्षणापासून अतिमानसिक नवजगताच्या निर्मितीसाठी त्यांनी पुन्हा एकदा नव्याने आरंभ केला.

''महेश्वरी ही बलशाली आणि प्रज्ञावान आहे; ती अतिमानसिक अनंततेप्रत आणि वैश्विक विशालतेप्रत, परम प्रकाशाच्या वैभवाप्रत, अद्भुत ज्ञानाच्या गुप्त खजिन्याप्रत, दिव्य मातेच्या चिरंतन शक्तींच्या अगणित गतिविधींप्रत आपल्याला उन्मुख करते. मात्र ती परमेश्वराच्या निर्णयाचे अनुसरण करत असते.''

याचा यापेक्षा उत्तुंग आदर्श दुसरा कोणता असणार?

आधारित – (CWM 09 : 148-150)

*